# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १०-११-२०१५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

मंगळवार दिनांक १० नोव्हेंबर-२०१५ रोजी (का.प.क्र.०९) मा.महापौर श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११:१० वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.अति.आयुक्त श्री.रमेश पवार नगरसचिव, श्री.दिलीप सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

१. स.स. श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड
२. स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर
३. स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव
४. स.स. श्री. खान जहाँगीर मुलानी
५. स.स. श्री. जाधव बन्सी ग्यानू
६. स.स. श्री. वाघमारे रुपचंद लक्ष्मण
७. स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग
८. स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
९. स.स. सौ. रोजतकर पुष्पा उत्तमराव
१०. स.स. श्री.विजय साईनाथ औताडे
११. स.स. श्री. सुरे सीताराम इसराम
१२. स.स. सौ. स्वाती किशोर नागरे
१३. स.स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१४. स.स. श्री. जाधव ज्ञानोबा पांडूरंग
१५. स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय
१६. स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद
१७. स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद
१८. स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद
१९. स.स. श्री. सय्यद मतीन रशीद
२०. स.स. श्रीमती शकीला बेगम फैयाजोद्दीन
२१. स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ
२२. स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल
२३. स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी
२४. स.स. श्री. सिद्दीकी नासेर तकीउद्दीन
२५. स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम
२६. स.स. श्रीमती खरात सिमा गणपत
२७. स.स. सौ. शोभा नारायणराव वळसे
२८. स.स. श्री. चित्ते नितीन रमन
२९. स.स. सौ. ज्योती सुभाष पिंजरकर
३०. स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र
३१. स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी

३२. स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले
३३. स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग
३४. स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप
३५. स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव
३६. स.स. श्री.शिंदे राजु रामराव
३७. स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम
३८. स.स. श्री. मकरंद माधवराव कुलकर्णी
३९. स.स. श्री. खान इरशाद इब्राहिम
४०. स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ
४१. स.स. श्री.अजीम अहेमद रफीक
४२. स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी
४३. स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी
४४. स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन
४५. स.स. कु.यशश्री लक्ष्मीनारायन बाखरीया
४६. स.स. श्री. तनवाणी राजु लेखराज
४७. स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव
४८. स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ
४९. स.स. श्री.किर्ती महेंद्र शिंदे
५०. स.स. श्री. भादवे रामेश्वर बाबुराव
५१. स.स. श्री. बल्लाळ मनोज आसाराम
५२. स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी
५३. स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास
५४. स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण
५५. स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास
५६. स.स. श्री. शेख जफर अखतर
५७. स.स. श्री. जहागीरदार मोहम्मद अयुब गुलाम जिलानी
५८. स.स. श्रीमती गादगे शितल विरभद्र
५९. स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
६०. स.स. श्री. दांडगे शिवाजी भाऊसाहेब
६१. स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत
६२. स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश
६३. स.स. श्री. खैरे ऋषिकेश चंद्रकांत
६४. स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी
६५. स.स. श्री. बारवाल गजानन रामकिसन
६६. स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण
६७. स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर
६८. स.स. श्रीमती बनकर विजया संजय
६९. स.स. श्री.साळवी नितीन दशरथ
७०. स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल
७१. स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र
७२. स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत

७३. स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास
७४. स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद
७५. स.स. श्रीमती सत्यभामा दामु अण्णा शिंदे
७६. स.स. श्री. जगताप भाऊसाहेब उत्तमराव
७७. स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र
७८. स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव
७९. स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव
८०. स.स. श्री. भगवान (बापु) देविदास घडमोडे
८१. स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल
८२. स.स. श्री.सोहेल शकील शेख
८३. स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे
८४. स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब
८५. स.स. श्रीमती मिना रामदास गायके
८६. स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव
८७. स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम
८८. स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे
८९. स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल
९०. स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ
९१. स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर
९२. स.स. श्रीमती निकाळजे लता मगन
९३. स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ
९४. स.स. श्री.विकास रतनलाल जैन
९५. स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद
९६. स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे
९७. स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
९८. स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे
९९. स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे
१००. स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी
१०१. स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण

**<u>नामनिर्देशित पालिका  सदस्यांची नावे</u>**

१. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
२. श्री.कांबळे चेतन जनार्धन

मा.महापौर :सर्व स.पदाधिकारी स.सदस्य,अधिकारी कर्मचारी व शहरातील सर्व नागरीकांना दिपावलीच्या शुभेच्छा

श्री.रेणुकादास वैद्य :माजी सदस्य श्री.प्रफुल्ल मालानी यांचे बंधु रामकिशन मालानी यांचे दु:खद निधन झाले श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.भगवान घडमोडे :यास अनुमोदन आहे.

श्री.नंदकुमार घोडेले : यास अनुमोदन आहे.

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

(या वेळी स्व.रामकिशन मालानी यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.)

| | |
|---|---|
| श्री.भगवान घडमोडे | :मागच्या बैठकीला अधिकारी संघटनेने सभेला गैरहजर का आहे कलम टाकून निवेदन दिले. आज कोणत्या नियमानुसार हजर आहे माहिती दयावी. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :टिंगल-टवाळी शब्द वापरला होता. त्या बद्दल तसेच बजेट संदर्भातील अधिकारी व्यतिरिक्त इतर अधिकारी कोणत्या नियमानुसार बसलेले आह? |
| अति.आयुक्त | :प्रशासनाच्या वतीने सर्वांना दिपावलीच्या शुभेच्छा, मागील बैठकीत अधिकारी गैरहजर होते त्यांचेशी चर्चा केली. विकास करण्यासाठी अधिकारी व स.पदाधिकारी लोकप्रतिनिधी एकत्र येणे आवश्यक आहे. ज्या काही तक्रारी असतील त्या सोडविणेचा प्रयत्न केला जाईल. |
| श्री.भगवान घडमोडे | :कोणत्या नियमानुसार हजर आहे. नवीन नियम आले का? बजेटचा विषय आहे. लेखा विभागाचे अधिकारी येथे असावे उर्वरीत अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्यात जावे. मदत लागली तर प्रशासनाने बोलवावे असा नियम आहे. ते पाळावे. |
| श्री.जहागींर खान | :मागील बैठकीत सर्व अधिकारी गैरहजर होते. आज का उपस्थित आहे? त्यावेळी सर्वच आजारी होते का? |
| श्री.राजू शिंदे | :मागील बैठकीच्या वेळी अधिकारी संघटनेने निवेदन दिले त्यात असलेला उल्लेख चुकीचा होता त्याबद्दल सभागृहाने निषेध केला. संघटनेचे अध्यक्ष यांनी माफी मागावी त्यानंतर बसू देण्यास हरकत नाही. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :माफी मागे पर्यत सभागृहात बसू देऊ नये. |
| श्री.राजू शिंदे | :उपस्थित राहण्याबाबत मा.महापौरांची परवानगी अधिकारी यांनी घेतली का? दिलगिरी व्यक्त करावी. अडचण नाही. कोणत्या नियमाने उपस्थित आहे. |
| मा.महापौर | :एकीकडे महापौर आयुक्त सांगतील तेंव्हा सभागृहात येऊ आज न विचारता उपस्थित आहे. अधिकारी यांचे म्हणणे काय आहे? |
| श्री.अ.रहिम नाईकवाडी | :सर्वांना दिपावलीच्या शुभेच्छा,अधिकारी यांनी निवेदनात दिले की जेंव्हा प्रश्न येईल तेंव्हा सभागृहात येऊ.निवेदनात जे शब्द वापरले सभागृहाचा अपमान केलेला आहे.आज कोणत्या नियमाने उपस्थित आहे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :दिपावलीच्या शुभेच्छा,स.सदस्य व अधिकारी यांनी मिळून काम केल्यास विकास होईल. अधिकारी संघटनेने निवेदन देऊन त्यात जे दिले ती अक्षम्य चुक केली. त्यांनी दिलगिरी व्यक्त करून या शहराच्या विकासासाठी नव्याने संकल्प करून मिळून काम करावे. |
| श्री.शेख अब्दुल ताहेर | :सर्वसामान्य जनतेसाठी ही संस्था आहे आणि शासकीय अधिकरी यांचेसाठी सभा तहकुब करावी लागत असेल तर गंभीर बाब आहे. कमेटीने अध्यक्ष कार्यवाही करावी. अधिकारी यांनी चुका करायच्या त्या आम्ही समोर आणायच्या नाही का? |
| मुख्य पशुसंवर्धन अधि. | :जे निवेदन दिले होते त्यामूळे सदस्यांच्या भावना दुखावल्या गेल्या दिलगिरी व्यक्त करतो परंतु ही परीस्थिती आमच्यावर का उदभवली याचाही आपण विचार करावा. |

मा.महापौर :बजेट संदर्भात बैठक आहे. त्या संबधीत अधीकारीच येथे बसावे उर्वरीत अधिकारी यांनी बाहेर जावे. काम पडेल तेंव्हा बोलविण्यात येईल.

**विषय क्रमांक २१९:-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९६ अन्वये स्थायी समितीने संमत केलेले सन २०१४-२०१५ चे सुधारित व सन २०१५-२०१६ या वर्षाचे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर विचार विनिमय करून महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियमाचे कलम १०० अन्वये अंतिम मान्यता देणे.

मुख्यलेखाधिकारी : सन २०१५-१६ चे अंदाजपत्रक मा.सभापती मा.महापौराकडे सादर करतील विनंती की मा.सभापती यांनी मा.महापौर मा.उपमहापौर मा.सभागृह नेता ,मा.विरोधी पक्ष नेता मा.आयुक्त तसेच सर्व पक्षाचे गटनेते यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करावे.

(या वेळी पुष्पगुच्छ देऊन स्वागत करतात मा.सभापती स्थायी समिती हे मा.महापौर यांचेकडे बजेट पुस्तक सादर करतात)

मा.सभापती :मा.महापौर व सर्व नवनिर्वाचित सन्माननिय सदस्य,माहे एप्रील-२०१५ मध्ये औरंगाबाद महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीमुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०३ व १०४ नुसार सन २०१४-२०१५ चे सुधारीत व कलम ९५ नुसार सन २०१५-२०१६ चे ०१ एप्रील २०१५ ते ३१ जुलै २०१५ या कालावधीचे अंतरिम आर्थिक अंदाज (लेखानुदान ) स्थायी समितीसमोर सादर करण्यात येऊन मंजुर करण्यात आले होते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०१५ -२०१६ चे मुळ अर्थसंकल्पिय अंदाज मा.आयुक्तांनी स्थायी समिती सभेसमोर मान्यतेकरिता दिनांक ०७.०८.२०१५ रोजी सादर केले. स्थायी समितीच्या सभेत आयुक्तांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकावर सर्व सदस्यांनी अभ्यासपुर्ण चर्चा करून प्रशासनाने सादर केलेल्या अंदाजपत्रकावर फेरफार व दुरूस्ती करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ नुसार त्यास मान्यता प्रदान केली. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०० नुसार अंतिम मान्यतेस्तव मा.महासभेसमोर तेहतीसावा अर्थसंकल्प सादर करीत आहे.

शहराची वाटचाल स्मार्ट सिटीकडे जात असतांना शहरातील एकुण ०५ रस्त्याचे मजबुतीकरण व रूंदीकरण करण्याचे कामे शासकीय अनुदानातुन हाती घेण्यात आलेली आहे. या करिता महाराष्ट्र शासनाकडून रू.२४.३३ कोटी अनुदान महानगरपालिकेस प्राप्त आहे.

सर्व प्रथम मी सर्व नवनिर्वाचित स.सदस्य यांचे अभिनंदन करतो जसे सभापती या नात्याने माझे या पंचवार्षीक कालावधीमधील पहिलाचा अर्थसंकल्प आहे तसेच आपल्या सर्वांचा सुद्धा हा पहिलाच अर्थसंकल्प असुन या पासुन सर्व स.सदस्य यांना आपल्या प्रभागात विकास कामे करण्याचा मोठया प्रमाणावर मानस आहे तथापी महानगरपालिकेची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची व नाजुक असुन सर्व नव निर्वाचीत

सन्मानिय सदस्यांच्या वार्डामध्ये नागरी सुविधा पुरविण्याच्या भावनेतुन विकास कामे करण्यासाठी भरीव तरतुद उपलब्ध करण्यात देण्यात आलेली आहे.

तसेच मराठवाडा मुक्ती संग्राम संग्रहालयासाठी सन २०१५-२०१६ च्या अर्थसंकल्पामध्ये शासकीय अनुदान महानगरपालिकेचा हिस्सा रू.१८.०० कोटी मधुन रू. ०३.०० कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे.

महानगरपालिकेच्या शाळेतील जे विद्यार्थी गणवेशापासुन वंचित राहिले अश्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश पुरविणे करिता आवश्यक तरतुद अंदाजपत्रकामध्ये करण्यात आलेली आहे. तसेच महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल वैज्ञनिक माहिती प्राप्त होईल, कलागुणांना वाव मिळेल, स्वतःचे ध्येय विकसीत करण्यास मदत होण्याच्या दृष्टीने गुजरात राज्यामध्ये पाठविण्यात येणार आहे.

स्मार्ट सिटी मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कराची वसुली ची टक्केवारी ८०% होणे आवश्यक आहे.या साठी शहरातील नव्या मालमत्तेचा शोध घेणे  मालमत्ता कराच्या वसुलीमध्ये सुसुत्रता यावी व प्रभावीपणे वसुली करुन महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रशासनाने सर्व विभागातील कार्यरत कर्मचा-यांचा आढावा घेऊन अनावश्यक कर्मचा-यापैकी या दोन्ही विभागासाठी २५% वाढीव व आवश्यक कर्मचारीवर्ग उपलब्ध करुन द्यावा.

गरीबाभिमुख (प्रोपुअर बजेट) झोपडपटटी विकास कार्यक्रम, दलित वस्ती सुधार योजना, अल्पसंख्यांक बहुल वसाहतींमध्ये नागरी सुविधा पुरविण्यासाठी शासन निर्देशानुसार तरतुद करण्यात आली आहे. सदरील तरतुद सहा प्रभागात समान विभागणी करण्यास मंजुरी दिलेली आहे. दिनांक ३० नोव्हेंबर २०१५  पर्यंत मा. आयुक्तांनी सदरील तरतुदी मधुन हाती घ्यावयाच्या कामांचे नियोजन करुन स्थायी समितीस अवगत करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

प्रशासनाने सादर केलेल्या मु ळ  अंदाजामधील स्थानिक संस्था कर, मालमत्ता कर, नगररचना विभाग,  इतर  वसुलीच्या उद्दिष्टा मध्ये पुढील प्रमाणे अनुक्रमे वाढ करण्यात येते. रु.२५.०० कोटी, रु. ५०.०० कोटी, रु.१५.०० कोटी, रु.१६.०० कोटी वाढ असे  एकुण रु.११०.०० कोटीची वाढ सुचविण्यात आली आहे. त्याच प्रमाणे काही प्रमाणात प्रशासकीय खर्चात काटकसर करण्यात येऊन सदर तरतुद विकास कामांसाठी करून देण्यात आलेली आहे.

उपरोक्तनुसार प्रशासनाने सादर केलेल्या अर्थसंकल्पिय अंदाजामध्ये  फेर फार, दुरुस्ती व वाढ करुन सन २०१५-१६  करीता महानगरपालिकेचे मुळ अंदाजपत्रक जमा रु.८५९ कोटी  ०२ लक्ष ०० हजार  या मध्ये प्रारंभीची शिल्लक २४ लक्ष ८४ हजार असे एकुण ८८३ कोटी  ८६ लक्ष २७ हजार जमा व खर्च रु. ८८३ कोटी  ८२ लक्ष ८०

हजार विचारात घेऊन रु.०३ लक्ष ४९ हजार शिलकीच्या अर्थसंकल्प मा. सर्वसाधारण सभेसमोर सादर करीत आहे.

माझ्या कार्यकाळात माननीय सभापती विधान सभा महाराष्ट्र राज्य हरीभाऊजी बागडे,माननीय मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य, श्री.देवन्द्रजी फडणवीस,माननीय प्रदेशाध्यक्ष भारतीय जनता पार्टी तथा खासदार श्री रावसाहेब दानवे, मा.सौ.विजया ताई रहाटकर, राष्ट्रीय अध्यक्ष महिला मोर्चा भारतीय जनता पार्टी, पर्यावरण मंत्री तथा पालक मंत्री मा.रामदासजी कदम,माननीय खासदार श्री. चंद्रकांतजी खैरे,मा. आ.अतुलजी सावे,मा.आ.संजयजी शिरसाट,मा.आ.श्री.इम्तियाजजी जलिल,मा.आ.सतिशजी चव्हाण,भाजपाचे शहरजिल्हाध्यक्ष बापु घडमोडे, भारतीय कामगार मोर्चा प्रदेशाध्यक्ष श्री.संजयजी केणेकर,शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष श्री.अंबादासजी दानवे,यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. मा.महापौर व सर्व सन्माननिय पदाधिकारी तसेच स्थायी समितीचे सन्माननिय सदस्य यांनी मला वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केले या बद्दल मी त्यांचा आभारी आहे. यापुढेही माझे सर्व सहकारी शहर विकासाच्या दृष्टीने योग्य ते सहकार्य करतील अशी मी सर्वांकडून आशा बाळगतो.

प्रशासनिक पातळीवर मा.आयुक्त व त्यांचे सर्व सहकारी यांनी सहकार्य केलेले असुन यापुढेही स्थायी समितीस विशेष सहकार्याची अपेक्षा व्यक्त करतो.

आपल्या शहरातील सर्व प्रसार माध्यमे व वर्तमानपत्रांचे प्रतिनिधी, इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे प्रतिनिधी यांचेकडुन आजपर्यंत मला जे सहकार्य लाभले आहे याबद्दल मी त्यांचा आभारी आहे तसेच भविष्यातही अश्या प्रकारचे सहकार्य लाभेलअशी अपेक्षा व्यक्त करतो.

श्रीमती समीना शेख :यावर अभ्यास करण्यासाठी २-३ दिवसाचा वेळ दयावा.

श्री.राजू शिंदे :बजेट सादर केले मा.सभापती यांचे अभिनंदन,बजेट येण्यास आधीच उशीर झाला. सर्वांच्या वतीने विनंती की सर्व वार्डात विकास होण्यासाठी तरतूद घोषीत करावी व सर्व अधिकार मा.महापौरांना दयावे अशी विनंती करतो.

श्री.गजानन बारवाल :बजेट येण्यास उशीर झाला यात तांत्रिक अडचणी होत्या. आता वेळ न जाता आपल्याच मार्गदर्शनाखाली हे बुक तयार केले सर्व पदाधिकारी गट नेता यांना माहिती आहे. जास्तीत जास्त बजेट वार्डासाठी देऊन हे बजेट मंजूर करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :बजेट सादर केल्या बद्दल मा.सभापती यांचे अभिनंदन, बजेट येण्यास उशीर झालेला आहे वेळ देऊन नंतर मंजूर करण्यास वेळ होईल मा.सभापती यांनी जवळपास सर्वच वार्डात चांगली तरतूद केली. कमी-जास्त झाले असेल तर ते सर्व अधिकार आपणांस आम्ही देत आहोत. दुरूस्ती करावी महापौराचा अधिकार कायम ठेवावा तदतुद करावी.

श्री.भगवान घडमोडे :मा.सभापती यांनी चांगले बजेट सादर केले. सादर करण्यास उशीर झाला विकास कामे होणे गरजेचे आहे मंजूरी दयावी.

श्री.जहागींर खान :तातडीच्या कामासाठी १० कोटी आपल्या अधिकारात ठेवावे. यात दुरूस्ती करून हे बजेट अंतिम करावे.

श्री.जमीर कादरी :१९९० ला जुन्या शहराचा डीपी प्लॅन केला त्यात बरीच घरे तोडली गेली. तो भाग विकसीत करण्यासाठी २५ कोटी तरतूद करावी. यावर अभ्यास करण्यासाठी वेळ दयावा.

श्री.जहागींर खान :यातील कामे स्पील मध्ये जाणार का? १०-१० वेळेस संचिका परत येऊ नये कामे व्हावी.जी तरतूद होईल त्यातून पुर्ण कामे व्हावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :मा.सभापती यांचे अभिनंदन,सर्व समावेशक बजेट सादर केले ज्या दुरूस्त्या करायच्या ते अधिकार आपणांस देऊन सभागृहाच्या वतीने दुरूस्तीसह मंजूरी दयावी अंदाजपत्रक तयार करून पुढील महिण्यात वर्क ऑर्डर होऊन कामे सुरू करण्याचे आदेशीत करावे.

मा.महापौर :मा.सभापती व समितीचे सर्व सदस्य यांनी चांगले नियोजन करून हे बजेट केले. सर्वाचे अभिनंदन,सन २०१५-१६ या आर्थीक वर्षाकरीता स्थायी समितीने मंजूर केलेले बजेट सर्वसाधारण सभेपुढे सादर केलेले आहे. सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन स्मार्ट सिटी कडे जात असतांना पुर्ण शहराचा विकास व्हावा मग तो कुठलाही भाग असेल यात मा.सभापती यांनी न्याय देण्याचा प्रयत्न केला काही वार्डासाठी कमी बजेट झाले असेल व काम करणे आवश्यक आहे जास्त बजेट लागणार आहे तेथे बजेट देण्यात येईल. सरसकट प्रत्येक वार्डासाठी २५ लक्षची तरतूद करण्यात येते. शासनाकडून नगरोत्थान व इतर योजनेसाठी जो निधी मनपास येत असतो त्यात ५० टक्के हिस्सा मनपाने भरावा असे असते. त्यासाठी सुध्दा अर्थसंकल्पात नियोजन करण्यात येईल. गुंठेवारी स्लम व जुन्या वसाहतीमध्ये आजही कामे थांबली आहे. भुमिगत गटार योजनेच्या माध्यमातून ड्रेनेज लाईनचे नियोजन होते माझ्या माहिती प्रमाणे केंद्र शासनाची यात अमांऊट कमी झाली. त्यामुळे काही ठिकाणी कामे झाली नाही तर बजेटच्या माध्यमातून नियोजन करावे लागणार आहे. प्रशासनाने तात्काळ अंदाजपत्रक तयार करावे कामे तातडीने व्हावी. आताच सदस्यांनी सुचना केल्यानुसार दुरूस्तीसहीत सन-२०१४-१५ चे सुधारित सन २०१५-१६ या आर्थीक वर्षासाठीचा अर्थसंकल्पास मान्यता देण्यात येते.

श्री.राजू शिंदे :कोणत्याही पक्षाचा भेदभाव न करता सरसकट २५ लक्ष प्रत्येक वार्डसाठी तरतूद केल्याबद्दल मा.महापौरांचे अभिनंदन करतो. प्रशासनाने ताबडतोब अंदाजपत्रक तयार करून विकास कामे मार्गी लावावी.

श्रीमती सायरा बानो :सर्वांना दिपावलीच्या शुभेच्छा देते, प्रत्येक वार्डसाठी २५ लक्ष समान बजेट दिल्याबद्दल अभिनंदन करते.

**<u>ठराव :-</u>**

स्थायी समिती मार्फत सादर करण्यात आलेल्या मुळ सन २०१५-२०१६ चे मुळ अंदाजपत्रकावर जमा व खर्चाच्या बाजुवर सर्व सन्माननिय सदस्य यांनी अभ्यासपुर्ण चर्चा करुन स्थायी समितीने स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता बेताची आर्थिक परिस्थिती असतांना सुध्दा सर्व सदस्यांच्या वॉर्डात प्राथमिक मुलभुत सुविधा व विकास कामांसाठी पुरेशी आर्थिक तरतुद उपलब्ध करुन दिलेली आहे.

फेर आढाव्यानंतर वॉर्डात वाढीव तरतुद आवश्यक असल्यामुळे सन्माननिय सदस्य यांच्या वॉर्डात स्थायी समितीने केलेल्या तरतुदी व्यतिरिक्त प्रत्येकी रु.२५.०० लक्षची तरतुद विविध महसुली व भांडवली कामांसाठी सर्वसाधारण सभेमार्फत करण्यात येत आहे. सदर तरतुदी अंतर्गत करण्यात येणारी कामे ही विभागाने प्रस्तावित करतांना अर्थसंकल्पिय लेखाशिर्ष निहाय प्रस्तावित करावी व त्यानुसार प्रशासनाने आवश्यक ती तरतुद त्या त्या लेखाशिर्षामध्ये उपलब्ध करुन द्यावी.

शहरातील नगरीकांना इतर विशेष सुविधासुध्दा पुरविण्यात येणार असल्यामुळे स्थायी समितीने सादर केलेल्या अर्थसंकल्पात एकुण रु.६९.०५ कोटीची वाढ करण्यात आलेली येत आहे. याकरीता आर्थिक तरतुद करण्यात आलेली आहे.

स्मार्ट सिटी च्या दुसऱ्या टप्प्यात शहराचा समावेश होईल ही अपेक्षा विचारात घेऊन नागरी स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून सर्व करांची वसुली ही उद्दिष्टांच्या ८०% होणे आवश्यक आहे. यासाठी शहरातील मालमत्तांचे सर्वेक्षण व पुर्नःमुल्यांकन नव्याने करण्याचे आदेश प्रशासनास देण्यात येत आहे, त्यानुसार प्रशासनाने चालु आर्थिक वर्षात योग्य कर प्रभावीपणे वसुल करुन महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावे.

स्थायी समितीमार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०३ व १०४ अन्वये सन २०१४-१५ चे सुधारीत अर्थसंकल्पिय जमा रु.४४७ कोटी ८५ लक्ष ५० हजार या मध्ये प्रारंभीची शिल्लक २२ कोटी ६३ लक्ष २४ हजार असे एकुण ४७० कोटी ४८ लक्ष ७४ हजार व खर्च रु.४७० कोटी ३९ लक्ष ०० हजार विचारात घेऊन रु.१८ लक्ष ७४ हजार शिलकीच्या सुधारित अर्थसंकल्पास तसेच ०१ एप्रिल-२०१५ ते ३१ जुलै-२०१५ पर्यंतच्या लेखानुदानास व स्थायी समितीने सन २०१५-१६ चे अंदाजपत्रक मान्यता प्रदान करेपर्यंत करण्यात आलेल्या खर्चास मान्यता देण्यात येते.

स्थायी समितीने सादर केलेल्या अर्थसंकल्पिय अंदाजामध्ये फेर फार, दुरुस्ती व वाढ करुन सन २०१५-१६ करीता महानगरपालिकेचे मुळ अंदाजपत्रक जमा रु.९२८ कोटी ०७ लक्ष ०० हजार यामध्ये प्रारंभीची शिल्लक २४ कोटी ८४ लक्ष २७ हजार असे एकुण ९५२ कोटी ९१ लक्ष २७ हजार जमा व खर्च रु.९५२ कोटी ७९ लक्ष ८० हजार विचारात घेऊन रु.११ लक्ष ४७ हजार शिलकीच्या अर्थसंकल्पास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०० नुसार सर्वानुमते मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

याबरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद